प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE
CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
Regd. Office: Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
Head Office: CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294;
For updated information, follow us on - @cidco_ltd :/cidco YouTube CIDCO Ltd. @cidco_ltd

**दि. ११ ऑक्टोबर २०२४**

## नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि नैना हे महाराष्ट्राला पॉवर हाऊस बनविणारे प्रकल्प – मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

ठाणे, दि.11(जिमाका):- सिडको महामंडळातर्फे साकारण्यात येत असलेल्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि नैना शहर या प्रकल्पांमध्ये महाराष्ट्राला देशाचे पॉवर हाऊस बनविण्याची क्षमता आहे, असे प्रशंसोद्गार मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे यांनी आज वाशी, नवी मुंबई येथे काढले.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्प येथे भारतीय वायुदलातर्फे सी-295 एअरक्राफ्टची लँडिंग आणि सुखोई-30 एअरक्राफ्टची फ्लायपास्ट चाचणी मुख्यमंत्री, श्री. एकनाथ शिंदे, श्री. मुरलीधर मोहोळ, नागरी उड्डाण राज्यमंत्री, उपमुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस, श्री.संजय शिरसाट, अध्यक्ष, सिडको, श्री. श्रीरंग बारणे, लोकसभा सदस्य, मावळ, श्री. नरेश म्हस्के, लोकसभा सदस्य, ठाणे, श्री. श्रीकांत शिंदे, खासदार, कल्याण, गणेश नाईक, विधानसभा सदस्य, ऐरोली, श्री. प्रशांत ठाकूर, विधानसभा सदस्य, पनवेल, श्रीमती मंदा म्हात्रे, विधानसभा सदस्य, बेलापूर, श्री. महेश बालदी, विधानसभा सदस्य, उरण, श्री. विजय सिंघल, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको, श्री. शान्तनु गोयल, सहव्यवस्थापकीय संचालक, सिडको श्री. गणेश देशमुख, सहव्यवस्थापकीय संचालक, सिडको, श्री. दिलीप ढोले, सहव्यवस्थापकीय संचालक, सिडको यांसह सिडकोतील अधिकारी व कर्मचारी यांच्या उपस्थितीत यशस्वीरीत्या पार पाडण्यात आली.

त्यानंतर सिडको प्रदर्शन केंद्र, वाशी, नवी मुंबई येथे पार पडलेल्या समारंभात मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सिडकोच्या 26 हजार 502 सदनिकांच्या महागृहनिर्माण योजनेचा प्रारंभ, महाराष्ट्र भवन, नैना नगर रचना परियोजना 8 ते 12 मधील पायाभूत सुविधा विकास कामे, ठाणे नागरी पुनरुत्थान योजना (नवीन 3 हजार 833 सदनिका), पश्चिम परिघीय (नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ) मार्ग यांचे भूमिपूजन; 18 होल्सच्या आंतरराष्ट्रीय खारघर व्हॅली गोल्फ कोर्स व सेंटर ऑफ एक्सलन्स येथील दर्शक गॅलरी यांचे उद्घाटन आणि ईर्शाळवाडी पुनर्वसन प्रकल्पाचे लोकार्पण करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते.

या प्रसंगी श्री. श्रीरंग बारणे, लोकसभा सदस्य, मावळ, श्री. नरेश म्हस्के, लोकसभा सदस्य, ठाणे, श्री. निरंजन डावखरे, विधानपरिषद सदस्य, श्री. ज्ञानेश्वर म्हात्रे, विधानपरिषद सदस्य, श्री.गणेश नाईक, विधानसभा सदस्य, ऐरोली, श्रीमती मंदा म्हात्रे, विधानसभा सदस्य, बेलापूर, श्री. विजय सिंघल, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको, श्री. शान्तनु गोयल, सहव्यवस्थापकीय संचालक, सिडको श्री. गणेश देशमुख, सहव्यवस्थापकीय संचालक, सिडको, श्री. दिलीप ढोले, सहव्यवस्थापकीय संचालक, सिडको, श्री. सुरेश मेंगडे, मुख्य दक्षता अधिकारी, सिडको यांसह सिडकोतील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना मुख्यमंत्र्यांनी विमानांच्या यशस्वी लँडिंग व फ्लायपास्टकरिता सिडको व अन्य संबंधितांचे अभिनंदन केले. सिडकोच्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि नैना शहर प्रकल्पांद्वारे मुंबई महानगर प्रदेशाचा मोठ्या प्रमाणावर आर्थिक विकास घडवून आणण्याची व महाराष्ट्राला पॉवर हाऊस बनविण्याची क्षमता असल्याचे मतही त्यांनी व्यक्त केले. ईर्शाळवाडी दरडग्रस्तांकरिता कमी कालावधीत घरे बांधून सिडकोने मानवता जपली असल्याचा उल्लेखही मुख्यमंत्र्यांनी यावेळी केला.

याप्रसंगी ईर्शाळवाडी पुनर्वसन प्रकल्पातील दुर्घटनाग्रस्तांना मुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रातिनिधीक स्वरूपात घरांच्या चाव्यांचे वाटप करण्यात आले. तसेच ईर्शाळवाडी दरडग्रस्तांपैकी सिडकोमध्ये कंत्राटी स्वरूपावर नियुक्ती देण्यात आलेल्या व्यक्तींना मुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रातिनिधीक स्वरूपात नियुक्तीपत्रे देण्यात आली. तसेच सिडकोच्या विविध प्रकल्पांची माहिती देणाऱ्या कॉफी टेबल बुकचे प्रकाशनही मुख्यमंत्र्यांच्या हस्ते यापसंगी करण्यात आले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना श्री.विजय सिंघल यांनी सिडकोच्या प्रकल्पांविषयी संक्षिप्त माहिती दिली.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

**मा. संपादक महोदय,**

**वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धि देऊन उपकृत करावे, ही विनंती.**

**जनसंपर्क विभाग, सिडको**